क्रमांक: १२७६७ /ड-३ (समिती समन्वय)
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक : २० ऑगस्ट, २०२१.

# : : परिपत्रक : :

**संदर्भ :**
**१) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.३६१२/ड-३ दिनांक २ मार्च, २०२१.**
**२) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.५४५३/ड-३ दिनांक २४ मार्च, २०२१.**
**३) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.९३१६/ड-३ दिनांक १८ जून, २०२१.**
**४) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.११९०१/ड-३ दिनांक ४ ऑगस्ट,२०२१.**

मा.पीठासीन अधिकारी यांच्या निदेशानुसार राज्यातील कोविड-१९ महामारीच्या रुग्ण संख्येत घट होत असल्याने महाराष्ट्र विधानमंडळाच्या समित्यांना **कोविड-१९ च्या संदर्भात निर्बंध उठवलेल्या जिल्ह्यांमध्ये दौरे करण्यास** तसेच विधान भवन, मुंबई येथे मंत्रालयीन सचिवांची साक्ष घेण्यास अनुमती दिनांक ४ ऑगस्ट २०२१ रोजीच्या परिपत्रकान्वये देण्यात आली आहे. समित्यांनी राज्यातील ज्या जिल्ह्यांमध्ये दौरे आयोजित करण्यात येत आहेत त्या जिल्ह्यातील दौऱ्यासंदर्भातील तारखांच्या नोंदी ड-३,(अंदाज समिती) कक्षातील नोंदवहीत करणे आवश्यक आहे, जेणेकरून महाराष्ट्र विधानमंडळातील दोन किंवा अधिक समित्यांचा दौरा एकाच जिल्हयात एकाच वेळी होणार नाही. दोन समित्यांच्या एकाच जिल्ह्याच्या दौऱ्यादरम्यान किमान एक आठवड्याचे अंतर राहिल याबाबत सबंधित समित्यांनी निर्णय घेऊन तसे दौरे आयोजित करावे व नियोजन करावे.

**( राजेंद्र भागवत )**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**याची प्रत :**

१) सर्व समित्यांचे मा.समिती प्रमुख व मा.सदस्य.
२) या सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्ष.

**प्रतिलिपी :**

३) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव.
४) मा. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
५) मा.विरोधी पक्ष नेते (विधानपरिषद/विधानसभा) यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.